**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.०३/२०२५ मधील निशाणी क्रमांक १ खालील आदेश**

(सुकन्या अजय पिसाळ वि. अजय दिपक पिसाळ वै.६)

(CNR No.MHRT050001372025)

१. अर्जदार हिने प्रस्तुत अर्ज सामनेवाले यांच्याकडून दरमहा रक्कम रू. २०,०००/- तात्पुरती पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पृष्ठ्यर्थ अर्जदार हिने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (यापुढे सोयीकरीता व संक्षिप्तरित्या 'कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा' असे संबोधण्यात आले आहे) चे कलम १२ प्रमाणे मुळ अर्ज कलम १८, १९, २० व २२ अन्वये संरक्षण आदेश, आर्थिक सहाय्य, निवासी आदेश, नुकसान भरपाईचे आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदाराचे कथन असे आहे की, लग्न झाल्यानंतर आठ दिवसांनी लूज मोशन व्हायला लागले होते तरीसुध्दा ती घरची कामे व्यवस्थित पार पाडत होती. जेव्हा पतीने तिला माहेरी सोडले तेव्हासुध्दा ती आजारी होती. माहेरी गेल्यावर ती जास्तच आजारी पडली म्हणून तिने पतीला फोन लावला व सांगितले की, ''मला खूप त्रास होत आहे, इथे कुठे रिक्षा मिळत नाही तर तुम्ही मला डॉक्टरांकडे घेऊन जायला याल का?'' त्यावर पती बोलला की, ''मला यायला नाही जमणार तसेच येणारसुध्दा नाही.'' पतीच्या अशा उत्तराने ती नाराज झाली. त्यानंतर अर्जदाराच्या आईने रिक्षा करून तिला भोसले डॉक्टरांकडे नेले. तिथे तिच्यावर उपचार झाले. त्यानंतर तिच्या मोठया भावाने पतीला फोन करून तिला डॉक्टरांकडे का घेऊन गेला नाहीस अशी विचारणा केली. त्यावेळी पती तिला पाहायला आले व लगेच घाईमध्ये परत निघून गेले. ती माहेरी फक्त दोन दिवस राहिली. तिस-या दिवशी पती तिला न्यायला आले व ती सासरी गेली. मे २०२४ मध्ये सकाळी १०.३० वा.चे सुमारास तिथे गेल्यावरसुध्दा लूज मोशन थांबत नव्हते म्हणून पतीला तिने सांगितले की, ''डॉक्टर साळुंखे यांच्याकडे घेऊन चला.'' त्यानंतर पतीने डॉक्टर साळुंखे यांच्याकडे नेले. घरी

आल्यानंतरसुध्दा तिला खूप चक्कर येत होती व लूज मोशनमुळे तिच्या शरीरातील सर्व पाणी निघून गेले होते असे डॉक्टर साळुंखे यांनी तिला सांगितले. डॉक्टरांकडे जाऊनसुध्दा चक्कर थांबत नव्हती. सोमवारी सकाळी तिला खूप चक्कर येत असल्याने तिला उठवत नव्हते तरीपण तिने जबरदस्तीने घरातील अर्धी कामे केली व नंतर ती बेडरूममध्ये झोपली होती. त्यानंतर पती घरी आले व खूप तीव्र आवाजामध्ये तिच्यावर ओरडले आणि बोलले की, ''ए उठ.'' पतीच्या आवाजाने ती घाबरली व धक्का बसल्यासारखी उठली. तिने पतीला काय झाले म्हणून विचारले असता तिचे पती खूपच रागामध्ये आणि तीव्र आवाजामध्ये तिच्याशी बोलू लागल्याने तिला खूपच वाईट वाटले. त्यानंतर सासू तिथे आली आणि बोलू लागली की, ''आम्हाला तुला सून म्हणून करायची नव्हती व तूला सून म्हणून करून आम्ही खूप मोठी चूक केली.'' त्यानंतर तिच्या पतीने मोठया आवाजामध्ये विचारले की, ''तुला झोपायला काय झालंय.'' त्यावर अर्जदार म्हणाली की, ''मला चक्कर करते म्हणून मी झोपले.'' त्यावर पतीने अर्जदाराचा डावा हात पकडून जोरात ओढले आणि काही वेळानंतर धावत येऊन वाकवून मानेवर, पाठीवर मारहाण केली. अर्जदार पुढे असे कथन करते की, दि.१३.०९.२०२४ रोजी गावातील प्रतिष्ठित लोकांची मिटींग बसली होती त्यावेळी पतीने तिच्या चारित्र्यावर संशय घेतला आणि बोलला की, ''हिचा कोणीतरी प्रियकर आहे त्यामुळे मला हिला सांभाळायचे नाही.'' अर्जदाराची सासू तिच्याशी भांडण करून बोलली की, ''तू आमच्या घरात पनवती आहेस, तू आमच्या घरात पिडा म्हणून आलीस, तू येण्यापूर्वी आम्ही चांगले सुखी होतो.'' अर्जदार हिचा पती बोलला की, ''तू बायको म्हणून लायकीची नाहीस, मला तुझ्याशी रहायचे नाही, तुझ्याशी संसार करायचा नाही.'' अर्जदारचे सासरे दुस-या मिटींगला बोलले की, ''तुझ्या आयुष्याची काय रक्कम सांग आम्ही देऊ.'' दि.२२.०९.२०२४ पासून तिचा पती पालनपोषणासाठी पैसे देत नाही तसेच अन्न, औषधे, कपडे देत नाही. अर्जदाराला सासरच्या लोकांनी मूळ घरात प्रवेश करण्यास मज्जाव केलेला आहे.

४. सामनेवाला क्र.१ याने नि.क्र.९ वर म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, सदर विवाह हा प्रेमविवाह होय. सामनेवाला याचे कुटूंब गरीब असून शेती हा प्रमुख व्यवसाय आहे व सामनेवाला याच्या वडिलांची जमीन कोकण रेल्वे संपादन झाल्यामुळे त्या मुद्यावर नोकरी मिळाली आहे. सामनेवाला यांनी लग्नानंतर अर्जदारला वडिलांच्या घरी

आणली. लग्नानंतर केवळ ३१ दिवस अर्जदार राहिली. सदर ३१ दिवसांमध्ये अर्जदार दि.०५.०४.२०२४ ते २२.०४.२०२४ असे चौदा दिवस सलग सासरी होती. दि.२७.०४.२०२४ रोजी पूजा झाली, २८.०४.२०२४ रोजी हळद उतरवणीचा कार्यक्रम झाला,३०.०४.२०२४ रोजी भरणे काळकाई देवीचे दर्शन करण्यात आले, ०१.०५.२०२४ रोजी कशेडी गजानन महाराज मठात दर्शन घेऊन त्याच दिवशी महाडला अर्जदार व सामनेवाला हे मामाकडे गेले. तेथे वस्ती केली. ०२.०५.२०२४ रोजी प्रतापगडला दर्शन घेतले व खवटी येथे घरी आले. ०५.०५.२०२४ रोजी गणपतीपुळयाला देवदर्शन करण्याकरीता घरातील सर्वजण गेले होते. ०३.०५.२०२४ व ०४.०५.२०२४ रोजी अर्जदार सासरी होती. त्यानंतर ०६.०५.२०२४ ते १०.०५.२०२४ हे पाच दिवस अर्जदार माहेरी होती. त्यानंतर अर्जदार आली व आल्यानंतर दि.१३.०५.२०२४ रोजी सकाळी सामनेवाल्याने अर्जदारला उठविल्यानंतर आठ वाजताच्या पुढे अर्जदार उठली व सामनेवालाच्या आईने बनविलेला नाश्ता खाल्ला. त्यानंतर सामनेवाला जंगलात रानभाजी आणायला गेले व ११ च्या सुमारास घरी आल्यावर अर्जदार झोपलेली होती म्हणून सामनेवालाने तिला काळजीपोटी विचारले असता माझे पाय दुखतात असे सांगितले. त्यावेळी सामनेवाला यांनी, ''बघ नाश्तापण आईने केला, तुला थोडेतरी कामाला मदत केली पाहिजे, आजपर्यंत तू कधीही काम केलेले नाही, प्रत्येकवेळी कामाच्या वेळी तू पाय दुखतो असे सांगतेस हे बरोबर नाही.'' त्यावर अर्जदार बोलली की, ''तुमची लायकी मला आधीच माहित होती, मी लग्न करून पस्तावलेली आहे, आई घालायला लग्न केलं का?'' अशी घाणेरडी भाषा वापरली व अर्जदार हिने तिच्या आईवडिलांना रिक्षा बोलावली व ताबडतोब माहेरी निघून गेली व जाताना सर्व कपडे, बॅग, सामान घेऊन गेली. अर्जदाराचे एकंदर वागणे पाहता अर्जदाराला नांदण्याचे नाही. तसेच अर्जदार ही फार मोठी स्वप्न पाहत आहे व ती स्वप्न पूर्ण करण्याची कॅपॅसिटी सामनेवाले यांच्यामध्ये नाही. अर्जदार ही अत्यंत उध्दट व घाणेरडे शब्द वापरते, तिच्या तोंडात घाणेरड्या शिव्या असतात, त्यामुळे सामनेवाले यांना अर्जदारसोबत राहायचे नाही. अर्जदाराने दि.२५.०९.२०२४ रोजी भाषा वापरून सामनेवाला यांचा अपमान केला व क्रुरतेने वागवले आहे. अर्जदाराचे वागणे हे क्रुरतेचे आहे. सामनेवाला याला अर्जदारने धमकी देऊन खोटया तक्रारी करणार असे सांगितले. सामनेवाला हा गरीब आहे, त्यास नोकरी नाही, तो शेती करतो, त्याला स्वत:चे उत्पन्नाचे

साधन नाही. दि.२५.०९.२०२४ रोजीच्या रेकॉर्डिंगमधीन मजकूर यामध्ये नमूद केला आहे. सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाच्या कथनांवरुन खालील मुद्दे उपस्थित होतात त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्राणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार हिने सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे काय? | नाही. |
| २) | अर्जदार ही प्रस्तुत अर्जात मागणी केल्याप्रमाणे तात्पुरते आर्थिक सहाय्य व संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | नाही. |
| ३) | आदेश काय? | अर्ज नामंजूर. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता</u>** :-

६. अर्जदार हिने मूळ अर्जामध्ये विस्तृतरित्या सामनेवाले यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबत कथन केले आहे. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जासोबत तिचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. याउलट सामनेवाला यांनी देखील त्यांच्या नि.क्र.९ वरील म्हणणेमध्ये अर्जदार हिच्या वर्तणुकीविषयी आरोप केले आहेत. दोन्ही पक्षाचा संपुर्ण पुरावा अभिलेखावर आल्याखेरीज त्यांच्या कथनातील तथ्ये पडताळता येणार नाहीत.

७. अर्जदार हिने अर्जामध्ये असे कथन केले आहे की, मे २०२४ मध्ये सकाळी १०.३० वा.चे सुमारास तिथे गेल्यावरसुध्दा लूज मोशन थांबत नव्हते म्हणून पतीला तिने सांगितले की, ''डॉक्टर साळुंखे यांच्याकडे घेऊन चला.'' त्यानंतर पतीने डॉक्टर

साळुंखे यांच्याकडे नेले. घरी आल्यानंतरसुध्दा तिला खूप चक्कर येत होती व लूज मोशनमुळे तिच्या शरीरातील सर्व पाणी निघून गेले होते असे डॉक्टर साळुंखे यांनी तिला सांगितले. डॉक्टरांकडे जाऊनसुध्दा चक्कर थांबत नव्हती. सोमवारी सकाळी तिला खूप चक्कर येत असल्याने तिला उठवत नव्हते तरीपण तिने जबरदस्तीने घरातील अर्धी कामे केली व नंतर ती बेडरूममध्ये झोपली होती. त्यानंतर पती घरी आले व खूप तीव्र आवाजामध्ये तिच्यावर ओरडले आणि बोलले की, ''ए उठ.'' पतीच्या आवाजाने ती घाबरली व धक्का बसल्यासारखी उठली. तिने पतीला काय झाले म्हणून विचारले असता तिचे पती खूपच रागामध्ये आणि तीव्र आवाजामध्ये तिच्याशी बोलू लागल्याने तिला खूपच वाईट वाटले. त्यानंतर सासू तिथे आली आणि बोलू लागली की, ''आम्हाला तुला सून म्हणून करायची नव्हती व तूला सून म्हणून करून आम्ही खूप मोठी चूक केली.'' त्यानंतर तिच्या पतीने मोठया आवाजामध्ये विचारले की, ''तुला झोपायला काय झालंय.'' त्यावर अर्जदार म्हणाली की, ''मला चक्कर करते म्हणून मी झोपले.'' त्यावर पतीने अर्जदाराचा डावा हात पकडून जोरात ओढले आणि काही वेळानंतर धावत येऊन वाकवून मानेवर, पाठीवर मारहाण केली.

८. याउलट सामनेवाले यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, लग्नानंतर केवळ ३१ दिवस अर्जदार राहिली. दि.१३.०५.२०२४ रोजी सकाळी सामनेवाल्याने अर्जदारला उठविल्यानंतर आठ वाजताच्या पुढे अर्जदार उठली व सामनेवालाच्या आईने बनविलेला नाश्ता खाल्ला. त्यानंतर सामनेवाला जंगलात रानभाजी आणायला गेले व ११ च्या सुमारास घरी आल्यावर अर्जदार झोपलेली होती म्हणून सामनेवालाने तिला काळजीपोटी विचारले असता माझे पाय दुखतात असे सांगितले. त्यावेळी सामनेवाला यांनी, ''बघ नाश्तापण आईने केला, तुला थोडेतरी कामाला मदत केली पाहिजे, आजपर्यंत तू कधीही काम केलेले नाही, प्रत्येकवेळी कामाच्या वेळी तू पाय दुखतो असे सांगतेस हे बरोबर नाही.'' त्यावर अर्जदार बोलली की, ''तुमची लायकी मला आधीच माहित होती, मी लग्न करून पस्तावलेली आहे, आई घालायला लग्न केलं का?'' अशी घाणेरडी भाषा वापरली व अर्जदार हिने तिच्या आईवडिलांना रिक्षा बोलावली व ताबडतोब माहेरी निघून गेली व जाताना सर्व कपडे, बॅग, सामान घेऊन गेली. अर्जदाराचे एकंदर वागणे पाहता अर्जदाराला नांदण्याचे नाही. तसेच अर्जदार ही फार मोठी

स्वप्न पाहत आहे व ती स्वप्न पूर्ण करण्याची कॅपॅसिटी सामनेवाले यांच्यामध्ये नाही. अर्जदार ही अत्यंत उध्दट व घाणेरडे शब्द वापरते, तिच्या तोंडात घाणेरड्या शिव्या असतात, त्यामुळे सामनेवाले यांना अर्जदारसोबत राहायचे नाही. अर्जदाराने दि.२५.०९.२०२४ रोजी भाषा वापरून सामनेवाला यांचा अपमान केला व क्रुरतेने वागवले आहे. अर्जदाराचे वागणे हे क्रुरतेचे आहे. या कथनांवरुन असे दिसून येते की, अर्जदार व सामनेवाले यांनी एकमेकांविरुध्द कथने केली आहेत.

९. सदर प्रकरणामध्ये अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह अर्जातील कथनांप्रमाणे दि.२२.०४.२०२४ रोजी झालेला आहे. अर्जदाराने मुळ अर्जामध्ये मे २०२४ मध्ये झालेल्या घटनेबाबत वर्णन केले आहे. अर्जदार हिने सदर घटनेची नेमकी तारीख नमुद केलेली नाही. परंतु सामनेवाला क्र. १ याने नि.९ मध्ये दि.१३.०५.२०२४ रोजी अर्जदार स्वत: माहेरी निघुन गेली असे कथन केले आहे. त्यानंतर अर्जदाराने मूळ अर्जामध्ये दि.१३.०९.२०२४ रोजी गावातील लोकांनी मिटींग घेतल्याचे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला क्र.१ याने नि.९ मध्ये दि.१३.०९. २०२४ रोजीच्या मिटींगमध्ये बाबत नमुद केले आहे. सामनेवाला क्र.१ याने विवाहाची तारीख दि.२२.०४.२०२४ नंतर अर्जदार केवळ ३१ दिवस सामनेवाला क्र.१ सोबत राहिली असे नि.९ मध्ये नमुद करून दि.२२.०४.२०२४ पासुन ते दि.२५.०९.२०२४ पर्यंत अर्जदार किती दिवस सामनेवाला क्र.१ सोबत राहिली व अर्जदाराचे त्या दरम्यान असलेली वागणूक व वर्तन विस्तृतरित्या नमुद केले आहे. अर्जदाराचा मुळ अर्ज व सामनेवाला क्र.१ चे नि.९ मधील कथन यातील नमुद असलेल्या दिनांक याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, सामनेवाला क्र.१ याने कथन केल्याप्रमाणे अर्जदार एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता सामनेवाला क्र.१ सोबत व इतर सामनेवालांसोबत राहिलेली नाही. परंतु मुळ अर्जामध्ये सामनेवाला याने अर्जदाराला घराबाहेर काढण्याची धमकी दिली किंवा अर्जदाराला घराबाहेर काढले व त्यामुळे अर्जदाराला तिच्या माहेरी किंवा इतरत्र राहावे लागत आहे अशी वस्तुस्थिती नाही. मुळ अर्जामध्ये इतर सामनेवाला क्र.२ ते ६ यांनी कौटुंबिक हिंसाचार करून अर्जदाराला घराबाहेर काढण्याची धमकी दिली किंवा घराबाहेर काढले अशी वस्तुस्थिती दिसुन येत नाही. याउलट, सामनेवाला याने विवाहाच्या तारखेनंतर ते दि.१३.०५.

२०२४ पर्यंत अर्जदाराच्या सामनेवाला क्र.१ सोबत वास्तव्याबाबत विस्तृतपणे कथन केले आहे. अर्जदाराच्या मुळ अर्जामध्ये मे २०२४ या घटनेव्यतिरिक्त दि.१३.०९.२०२४ रोजी झालेल्या मिर्टींगमध्ये सामनेवाला क्र.१, सामनेवाला क्र.२ व ३ काय बोलले हे नमुद आहे परंतु अर्जदारने मे २०२४ मधील घटनेची तारीख अचुक नमुद केलेली नाही व या घटनेबाबत सामनेवाला क्र.१ याने नि.९ मध्ये परस्पर विरोधी कथन केलेले आहे. तसेच मुळ अर्जामध्ये मे २०२४ या अर्जदाराने नमुद केलेल्या घटनेव्यतिरिक्त ती सामनेवाला क्र.१ सोबत राहात असलेल्या कालावधीमधील इतर कोणतीही घटना नमुद नाही. त्यामुळे अर्जदार यांचा सामनेवाला क्र.१ सोबत विवाहानंतरचा एकंदरीत वास्तव्य असलेला कालावधी लक्षात घेता अर्जदाराचा सामनेवाला क्र.१ ते ६ यांनी आणि वैयक्तिकरित्या सामनेवाला क्र.१ याने व सामनेवाला क्र.२ व ३ यांनी कौटुंबिक हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

१०. मुळ अर्जामध्ये सामनेवाला अर्जदारासोबत त्याच घरामध्ये राहुन अर्जदाराला सद्यस्थितीला अर्जात कथन केल्याप्रमाणे त्रास देत आहे अशी वस्तूस्थिती दिसुन येत नाही. मुळ अर्जामध्ये सामनेवाला क्र.१ हा नमुद पत्त्यावर राहात असुन त्याने अर्जदार यांना घराबाहेर काढले आहे अशी वस्तूस्थिती दिसून येत नाही. अर्जदाराचा मुळ अर्ज, सामनेवाला याचे म्हणणे, अर्जदार व सामनेवाला यांनी दाखल केलेली कागदपत्रे याचे एकंदरीत बारकाईने अवलोकन केले असता सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केला असे सद्यस्थितीला प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. अर्जदाराने मुळ अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे सदर कौटुंबिक हिंसाचार झाला असल्यास त्या बाबी शाबीत करण्यासाठी सबळ पुराव्याची गरज आहे असे सद्यस्थितीला दिसुन येते.

११. सामनेवाला क्र.१ याचे नि.९ वरील कथन व सामनेवालाने नि.१९ सोबत अर्जदाराचे औषधोपचारासंदर्भातील दाखल केलेली कागदपत्रे लक्षात घेता निव्वळ अर्जदाराचे अर्जातील कथनांवरुन सामनेवाला यांनी अर्जदार हिचा छळ व कौटुंबिक हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी या स्थितीला निष्कर्ष काढता येणार नाही. त्यामुळे वर नमुद कारणास्तव अर्जदार हिचा सामनेवाला यांनी तिचा आर्थिक, शारीरिक, मानसिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द केलेले नाही. त्यामुळे अर्जदार ही पिडिता म्हणून कौटुंबिक

हिंसाचाराचा कायदा कलम २३ अन्वये तात्पुरते आदेश मिळण्यास पात्र नाही. तसेच अर्जदार हिने नि.१५ वर दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्व शपथपत्रावरून सद्यस्थितीला ती तिचे वडीलांचे घरी राहात असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला क्र.१ ते ६ यांच्यासोबत सद्यस्थितीला सामाईक घरात राहात आहे व अर्जदार हिला सामनेवाले सामाईक घरात राहात असताना हरकत अडथळा करत आहेत अशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे अर्जदार ही संरक्षण आदेश मिळणेस पात्र नाही. सबब मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता** :-

१२. अशा प्रकारे मुद्दा क्र.१ व २ च्या नकारार्थी निष्कर्षाच्या अनुषंगाने अर्जदार ही सामनेवाला याच्याकडून तात्पुरत्या स्वरुपात रक्कम दरमहा पोटगी स्वरुपात आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र नाही. सबब मुद्दा क्र. ३ च्या उत्तरार्थ मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना मोफत द्यावी.

Digitally signed by SAHIL SALIM MULANI
Date: 2026.08.06 15:58:07 +0530

दिनांक : ०६/०८/२०२६
ठिकाण : खेड.

(एस. एस. मुलाणी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, खेड.

**CERTIFICATE**

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | P.W.D.V.A. No. 03/2025 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Clerk | : | Shri. J. D. Ambekar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC Court, Khed |
| Date of Decision | : | 06.08.2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06.08.2026 |
| Order uploaded on | : | 06.08.2026 |